स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या सामाजिक विद्याशाखे अंतर्गत
समाजशास्त्र विषयातील पीएच. डी. पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा.

नगरपरिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास :
(विशेष संदर्भ : हिंगोली जिल्हा)

संशोधक

श्री.सातव सुभाष नारायणराव
समाजशास्त्र विभाग
नागनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
औंढा नागनाथ, जि. हिंगोली.

मार्गदर्शक

प्रा. डॉ. भिसे रामचंद्र मुंजाजी
(एम.ए., एम. फील., पीएच.डी., नेट)
समाजशास्त्र विभागप्रमुख
दिगंबरराव बिंदू कला व वाणिज्य महाविद्यालय
भोकर जि. नांदेड.

मार्च - 2016

प्रस्तावना :-

भारतात नागरी वस्ती प्राचीन कालखंडापासून आहे. नागरी प्रशासनाची सुरुवात देखील प्राचीन कालखंडातच झाल्याचे दिसून येते. " 'मनुस्मृती' 'महाभारत' आणि 'रामायण' या ग्रंथात नागरी प्रशासनाचा उल्लेख दिसून येतो."[१]

भारतातील नगरपरिषदांचा इतिहास प्राचीन आहे. प्राचीन काळात राजधानीचे शहर व उपकेंद्र असलेली छोटी शहरे अस्तित्वात होती. सर्वात प्राचीन समजल्या जाणाऱ्या सिंधू संस्कृतीतील मोहंजोदडो व हडप्पा येथील उत्खननावरुनही स्पष्ट झाले आहे की, प्राचीन भारतामध्ये नागरी संस्कृती अस्तित्वात होती. तत्कालीन परिस्थितीमध्ये शहरांचा कारभार हा शहर मंडळाकडून चालवला जात असे.

"वैदिक वाङ्मय, स्मृती-श्रृती यावरुन असे दिसून येते की, प्रत्येक नगरात संरक्षण, न्यायदान, शांतता व सुव्यवस्था, कर वसुली, विहीरी व पाटबंधारे योजनांची निर्मिती, रस्ते-पूल याची निगराणी व नैसर्गिक आपत्तीत साह्य करणारी सक्षम नगर यंत्रणा होती."[२] ई. वी. हॅवेल यांनी आपल्या 'हिस्ट्री ऑफ आयर्न रुल' या पुस्तकात म्हटले आहे की, नगरपरिषदांची रचना ही ग्रामसभेच्या धर्तीवर केलेली होती. मॅगस्थेनेसने आपल्या 'इंडिका' या ग्रंथात मौर्य साम्राज्याची राजधानी 'पाटलीपूत्र' मधील नागरी प्रशासनाच्या विकसित प्रणालीचे वर्णन केलेले दिसून येते. अबुल फझल लिखीत 'ऐन-ए-अकबरी' या ग्रंथात मोगल साम्राज्यातील नगरातील स्थानिक प्रशासनाचा स्पष्ट उल्लेख दिसून येतो. "मोगल काळात 'कोतवाल' नावाच्या अधिकाऱ्याद्वारे नागरी प्रशासन केले जात असे त्यांच्याकडे अत्यंत व्यापक स्वरुपाचे कार्य होते. कायदा व सुव्यवस्था, सामाजिक सुधारणा, गुप्तचर व्यवस्था इत्यादी निश्चित स्वरुपाचे कार्य प्राचीन नागरी संस्था पार पाडत असत."[३]

मौर्य काळात भारतात नगर शासन अतिशय विकसित होते हे त्यावेळेच्या ऐतिहासिक पुराव्यावरुन सिध्द होते.

नागरी स्थानिक स्वराज्य संस्था ह्या मुख्यत्वे करुन नागरी भागाच्या विकासासाठी निर्माण करण्यात आलेल्या संस्था आहेत. भारतातील या संस्थाचा इतिहास खुप प्राचीन असून त्यांचा विकास खऱ्या अर्थाने स्वातंत्र्योत्तर काळातच झालेला दिसून येतो. स्वातंत्र्योत्तर काळात या संस्थाचे महत्व वाढत जाण्याचे महत्वाचे कारण औद्योगिकरण व नागरीकरण हे आहे.

वाढत्या औद्योगिकरण व नागरीकरणामुळे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या कार्यात वाढ होत गेली व त्या नागरी जीवनाचा एका अविभाज्य अंग बनल्या आहेत. नागरी भागातील लोकांच्या दैनंदिन गरजांची पूर्ती करणाऱ्या संस्था म्हणून नगरपरिषदा व महानगरपालिका यांचे महत्व संपूर्ण देशात वाढत आहे. या संस्था नागरी भागातील रस्ते, स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, सांडपाणी, आरोग्य, दिवाबत्तीची व्यवस्था, शिक्षण अशा अनेक कार्याची जबाबदारी पार पाडत असतात. नगरपरिषदेतील वरिल कार्ये पार पाडण्यासाठी कर्मचारी हा महत्वाचा घटक आहे. नागरी स्वराज्य संस्थेची यंत्रणा ७४ व्या घटनादुरूस्तीने निश्चित केली आहे. या मध्ये नगरपरिषद स्तरावर दोन घटक कार्यरत असतात त्यातील एक घटक राजकीय व एक प्रशासकीय असतो राजकीय स्तरामध्ये प्रत्यक्ष मतदानाद्वारे नगरसेवकाची निवड करण्यात येते यातून नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष निवडला जातो यामध्ये विविध समित्या गठीत करून नगरपरिषद क्षेत्रातील कार्याचे धोरणात्मक निर्णय घेतले जातात. नगरपरिषेदेतील दु सरा घटक प्रशासकीय असतो. जिल्हाधिकाऱ्याच्या मार्गदर्शनाखाली प्रत्यक्ष मुख्याधिकाऱ्या मार्फत प्रशासकीय कारभार चालविला जातो. कर्मचाऱ्यांची निवड, भरती, बढती, सेवानिवृत्ती कर आकारणी, वेतन व भत्ते इत्यादी जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. कर अधिक्षक व सामान्य प्रशासन अधिकारी अशी द्वितीय श्रेणीची पदे भरली जातात त्याच बरोबर मुख्य लिपीक व इतर कनिष्ठ लिपीक असे तृतीय श्रेणीचे कर्मचारी कार्यरत असतात.मुख्याधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली सर्वजण आपले कार्य पार पाडतात. त्यामध्ये महत्वपूर्ण जनतेच्या सेवेशी प्रत्यक्ष चतुर्थ श्रेणी कर्मचारी शहरातील स्वच्छता विषयक कार्य पार पाडतात त्यामुळे प्रशासनातील चतुर्थ श्रेणी हा घटक महत्वपूर्ण आहे. त्यांच्या कार्यवरच नागरी सुवीधाची यंत्रणा उभी असते.

संशोधन समस्या :-

हिंगोली जिल्हा हा नवनिर्मित जिल्हा आहे. हिंगोली जिल्हा हा पूर्वीच्या परभणी जिल्ह्यातील एक तालुका होता. परभणी जिल्ह्याचे १ मे १९९९ रोजी विभाजन होवून हिंगोली जिल्हा अस्तित्वात आला. या नवनिर्वाचित जिल्ह्यामध्ये सध्या ३ नगरपरिषदा अस्तित्वात आहेत. ज्या मध्ये हिंगोली, वसमत व कळमनुरी तर सेनगाव व औंढा नागनाथ या ठिकाणी २०१६ पासून नगरपंचायतीद्वारे कारभार पाहिला जातो.

हिंगोली जिल्ह्यात एकुण ७१० महसूली गावे असून ५६५ ग्रामपंचायती , ०५ तालुके आहेत. हिंगोली जिल्हा हा महाराष्ट्रातील इतर जिल्ह्याच्या तुलनेत भौगोलीक दृष्टीने लहान आहे. त्यामुळे हिंगोली जिल्हा हा सामाजिक, आर्थिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला जिल्हा म्हणून ओळखला जातो. जिल्ह्यातील हिंगोली, वसमत व कळमनुरी नगरपरिषदेतील एकुण कर्मचाऱ्याची संख्या ३४६ असून प्रत्येक नगरपरिषेदेत एक मुख्याधिकारी हा प्रथम श्रेणीतील अधिकारी असतो तसेच तीनही नगर परिषदा ह्या ब दर्जाच्या असल्यामुळे नगरपरिषेदेमध्ये द्वितीय श्रेणी कर्मचारी नाहीत. तृतीय श्रेणी कर्मचाऱ्यांची हिंगोली, वसमत, व कळमनुरी नगरपरिषेदेतील एकुण संख्या ही ८६ आहे. तर चतुर्थ श्रेणी स्त्री-पुरुष कर्मचाऱ्यांची संख्या २६० आहे. चतुर्थ श्रेणी कर्मचारी प्रामुख्याने साफसफाई, दिवाबत्ती, रस्ते इत्यादी स्वरुपाची कार्य करित असतात. कर्मचारी वर्ग कमी असल्यामुळे त्यांना जास्त तास काम करावे लागते त्यामुळे कौटुबिक जबाबदाऱ्या पार पाडत असतांना अडचणी निर्माण होतात. चतुर्थ श्रेणी कर्मचारी हा सर्वात खालच्या स्तरातील घटक असल्यामूळे चतुर्थ श्रेणी कर्मचारी, अधिकारी व पदाधिकारी यांचे संबंध सलोख्याचे आहेत काय? शासनाकडून चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना कोणत्या सोयी सुविधा,व मिळणारे वेतन भत्ते पुरेशा प्रमाणात मिळतात का? त्यांची सामाजिक व आर्थिक परिस्थिती कशी आहे? चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्याच्या समस्या हया व्यापक आहेत. त्यामुळे संशोधन क्षेत्र निश्चित करुन प्रस्तुत संशोधन कार्यासाठी "नगरपरिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास." विशेष संदर्भः हिंगोली जिल्हा . हा विषय निश्चित केला आहे.

संशोधनाचे महत्व :-

कोणत्याही सामाजिक शास्त्रातील संशोधनाचा मूळ उद्देश हा सामाजिक समस्येची माहिती जाणून घेवून आपल्या व इतरांच्या ज्ञानात वृध्दी करणे हा असतो.प्रस्तुत संशोधनासाठी निवडण्यात आलेला विषय, ‘‘नगरपरिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास.’’ विशेष संदर्भः हिंगोली जिल्हा नगरपरिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना कामामुळे त्यांच्या कौंटुबिक जीवनात निर्माण होणारे ताणतणाव, शैक्षणिक समस्या, अधिकाऱ्यांशी असणारे संबंध, शासनाकडून मिळणाऱ्या सोयीसुविधा, सवलती, समाजाचा बघण्याचा दृष्टिकोन व त्यांच्या कार्याच्या संदर्भात असणाऱ्या समस्या जाणून घेवून त्यावर अभ्यासपूर्ण निष्कर्ष मांडणी करण्यात येईल. निष्कर्षावर आधारित उपाययोजना शिफारशी सुचविल्या जातील. त्याचा उपयोग शासनाला व धोरण निर्मीती करणाऱ्यांना होईल. त्यामुळे चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्याकडे बघण्याचा नकारात्मक दृष्टिकोन बदलण्यास उपयुक्त ठरणार आहे.

‘‘नगरपरिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास.’’ विशेष संदर्भः हिंगोली जिल्हा.

संशोधनाची उदिष्ट्येः-

१) नगरपरिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या सामाजिक स्थितीचे अध्ययन करणे.

२) नगरपरिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेणे.

३) नगरपरिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या कौटुंबीक ताणतणावाचे अध्ययन करणे .

४) नगरपरिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची आरोग्यविषयक जागृकता जाणून घेणे.

५) नगरपरिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्याची व पाल्यांची शैक्षणिक स्थिती जाणून घेणे .

६) नगरपरिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचारी- अधिकारी पदाधिकारी संबंध जाणून घेणे.

७) नगरपरिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांमधील व्यसनाधिनता जाणून घेणे .

गृहीतकृत्ये

१) नगरपरिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची आर्थिक स्थिती हालाखिची झालेली आहे.

२) नगरपरिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांमध्ये कौटुंबीक ताणतणाव असतो .

३) नगरपरिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचारी व पाल्यांना शिक्षण विषयक अडचणी आहे .

४) नगरपरिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचा अधिकारी, पदाधिकारी, सकारात्मक दृष्टीने विचार करित नाही.

५) नगरपरिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांमध्ये व्यसनाधिनतेचे प्रमाण अधिक आहे.

६) नगरपरिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना शासनाकडून सेवा सुविधा मिळत नाहीत.

७) नगरपरिषदेतील चतुर्थ श्रेणीतील कर्मचाऱ्यांना अनेक समस्यांना व अडचणीना सामोरे जावे लागते.

संशोधनाची व्याप्ती:-

१. प्रस्तुत अध्ययनाचे क्षेत्र हिंगोली जिल्हा या भोगोलिक क्षेत्रापुरते मर्यादित आहे.

२. प्रस्तुत अध्ययन हिंगोली जिल्ह्यातील हिंगोली, वसमत व कळमनुरी या तीन नगरपरिषदेपुरते मर्यादित आहे.

३. प्रामुख्याने अध्ययन विषयाच्या अध्ययनाचा केंद्रबिंदु नगरपरिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचारी आहे.

संशोधन पध्दती :-

संशोधन विषयाच्या अनुषगांने नगरपरिषदेतील कर्मचारी यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे अध्ययन करण्यासाठी विश्लेषनात्मक व वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग संशोधन कार्यासाठी केला जाणार आहे.

सैद्धांतिक आधार :-

नागरी समाजशास्त्र हे नगराचे परिस्थितीशास्त्र आणि मानवी व्यवहाराचे अध्ययन करते. या शाखेत नागरी समाजशास्त्रीय सिध्दांत , नगरांचा विकास, विघटनाबरोबरच नागरी समाज संघटनांचे पैलू , नागरी समस्या आणि नियोजन यासारख्या बाबींचा सुध्दा अभ्यास करते.

नागरी स्थानिक स्वराज्य संस्था हया नागरी भागासाठी कार्य करण्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या आहेत. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था प्रमाणेच नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची निर्मीती करण्यात आली असून १९९२ च्या ७४ व्या घटनादुरुस्तीने त्रिस्तरीय पध्दत निर्माण करण्यात आली. त्यामध्ये नगरपंचायत, नगरपरिषद व महानगरपालिका या नागरी स्थानिक स्वराज्य संस्था निर्माण करण्यात आल्या. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाद्वारेच नागरी भागाचा कार्यभार चालविला जातो. नागरी समाजशास्त्रातील संकल्पना व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा आधार घेवून संशोधन कार्य पूर्ण केले जाणार आहे.

नमुना निवड :-

संबंधीत संशोधन कार्याचे तथ्य संकलन करण्यासाठी यादृच्छिक नमुना निवड पध्दतीचा वापर करून लॉटरी पध्दतीने नमुना निवड करण्यात येणार आहे. हिंगोली जिल्हयातील तीनही नगरपरीषदेतील एकुण चतुर्थ श्रेणी् कर्मचा-यांची संख्या २६० एवढी असुन यातील पुरूष कर्मचा-यांची संख्या १८३ आहे व महिला कर्मचा-यांची संख्या ७७ आहे. संशोधनाच्या दृष्टीने एकुण कर्मचा-यांपैकी ७५ टक्के कर्मचा-यांची निवड केली आहे. यानुसार पुरूष कर्मचारी १३७ व महिला कर्मचारी ५७ अशी एकूण १९४ कर्मचाऱ्यांची निवड करून त्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास करून संशोधन कार्य पुर्ण करण्यात येणार आहे.

तथ्य संकलन :-

तथ्य हा संशोधनाचा आत्मा असतो. तथ्यांच्या आधारे संशोधक निष्कर्षापर्यंत पोहचतो. प्रस्तुत संशोधन कार्यामध्ये निष्कर्षापर्यंत जाण्यासाठी तथ्य संकलनाच्या प्राथमिक तथ्य संकलन पध्दतीचा अवलंब केला जाईल. प्राथमिक तथ्य संकलन पध्दती मधील प्रश्नावली, मुलाखत, अनुसूची या तंत्राच्या आधार माहितीचे संकलन करण्यासाठी केला जाणार आहे.

द्वितीयक तथ्य संकलन तंत्राचा अवलंब सुध्दा तथ्य संकलन करण्यासाठी केला जाणार आहे. यामध्ये संदर्भ ग्रंथ, अहवाल, शासकिय अधिनियम व अहवाल, नियतकालिके, मासिके, वर्तमानपत्रे, गॅझेटिअर अशा सर्व प्रकाशित व अप्रकाशित लिखित सामुग्रीचा समावेश केला जाणार आहे. याद्वारे प्रस्तुत संशोधन विषयाशी संबंधित माहिती व आकडेवारीचा उपयोग केला

जाणार आहे. प्राथमिक व द्वितियक तथ्य संकलनाच्या आधारे उद्देशापर्यंत पोहचण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

तथ्य विश्लेषण :-

प्रस्तुत संशोधनाच्या अनुषंगाने संकलित प्राथमिक तथ्यांचे संख्यात्मक आणि गुणात्मक वर्गीकरण करण्यात येणार आहे. वर्गीकृत तथ्यांचे सारणीकरण करुन विश्लेषण करण्यात येईल तसेच द्वितीयक तथ्य संकलन तंत्राच्या आधारे संकलित केलेल्या तथ्यांच्या आधारे विश्लेषण व अर्थनिर्वचन केले जाईल.

संशोधन मर्यादा :- संबंधीत संशोधन दिशाहीन व अमर्याद होऊ नये यासाठी विषय मर्यादा निश्चीत करण्यात आलेली असून एकुण अधिकारी व कर्मचाऱ्यांपैकी चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्याच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरणाची रुपरेषा :-

प्रस्तुत विषयाचे पैलू लक्षात घेऊन अभ्यासाकरीता प्रकरणांची मांडणी एकूण पाच प्रकरणामध्ये केलेली आहे.

प्रकरण पहिले :- नागरी प्रशासनाची ओळख व विकास

संशोधन क्षेत्र म्हणून हिंगोली जिल्ह्याची पार्श्वभूमी - प्रस्तूत घटकांमध्ये नवनिर्वाचित हिंगोली जिल्ह्याची भौगोलिक स्थिती, ऐतिहासिक पार्श्वभूमी, लोकजीवन व संस्कृती, उद्योगधंदे, लोकसंख्या इत्यादी घटकावर प्रकाश टाकण्यात येईल.

नगरपरिषद उदय आणि विकास - प्रस्तुत घटकामध्ये नगरपरिषदेचा उदय आणि विकास कसा झाला या घटकाचे अध्ययन करण्यात येईल. तसेच नागरी प्रशासनाचा विकास, नागरी भागातील नियोजन व्यवस्था कशी आहे याचे अध्ययन करण्यात येईल.

प्रकरण दुसरे :- सामाजिक संशोधन पध्दती व संशोधन साहित्याचा आढावा.

प्रस्तुत प्रकरणामध्ये सामाजिक संशोधन पध्दती व तथ्य संकलनाच्या माध्यमांचे विवेचन करून संबंधीत विषयासी निगडीत संशोधन साहित्याचे पुर्णविलोकन करण्यात आले आहे. जसे की शोध प्रबंध, संशोधन अहवाल, शोध निबंध इत्यादी.

प्रकरण तिसरे :- चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचे सामाजिक जीवन.

प्रस्तुत प्रकरणामध्ये नगरपरिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्याचे कौंटुबिक जीवन, नातेसंबध, सामाजिक स्थान, निवास व्यवस्था, कामाचे स्वरुप, सोयी सुविधा व त्यामुळे निर्माण होणार ताण तणाव इत्यादी घटकांचा अभ्यास केला

प्रकरण चौथे :- चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची शैक्षणिक व आर्थिक स्थिती.

प्रस्तुत प्रकरण हे दोन भागामध्ये विभाजीत केले असून पहिल्या भागामध्ये शैक्षणिक स्थिती तर दुसऱ्या भागामध्ये आर्थिक स्थितीचे अध्ययन केले जाणार आहे.

१. शैक्षणिक स्थिती

- चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची शैक्षणिक स्थिती
- शैक्षणिक स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न.
- चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना येणाऱ्या शैक्षणिक अडचणी

२. आर्थिक स्थिती

नगर परिषदेतील चतुर्थ कर्मचाऱ्यांना मिळणारे वेतन व भत्ते, मिळणारे वेतन व खर्च यांचा ताळमेळ, वेतनामध्ये अनियमितपणा, आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी शासनामार्फत केलेले प्रयत्न इत्यादीचे अध्ययन केले जाईल.

प्रकरण पाचवे :- चतुर्थ श्रेणी कर्मचारी, अधिकारी व पदाधिकारी संबंध.

प्रस्तुत प्रकरणामध्ये नगरपरिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांचा अधिकारी व पदाधिकारीशी संबंध येतो. कर्मचारी अधिकारी, कर्मचारी व पदाधिकारी यांच्यामध्ये संबंधाचे स्वरुप कसे आहे यावर प्रकाश टाकण्यात येईल.

प्रकरण सहावे :- निष्कर्ष व शिफारशी.

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधन विषयाला अनुसरून तथ्यसंकलनाद्वारे माहितीचे अध्ययन करुन निष्कर्ष नोंदविले जातील. तसेच गृहितकाची पडताळणी करुन नगरपरिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी शिफारशी सुचविल्या जातील.

संदर्भ सूची

अ) संदर्भ ग्रंथ

१) हिंगोली जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन (२०१३) जिल्हा सांख्यिकी कार्यालय, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, हिंगोली.

२) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन जिल्हा परभणी हिंगोली २००६ - २००७ अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र थासून मुंबई.

३) जिल्हा परिषद हिंगोली, वार्षिक प्रसासन अहवाल (२००५- २००६)

४) डॉ. भांडारकर पु.ल., सामाजिक संशोधन पध्दती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर.

५) डॉ. आगलावे प्रदिप (जाने. २०००), संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर.

७) डॉ. वा. भा. पाटील (२००६) संशोधन पध्द्ती, प्रशांत पब्लिकेशन्स. पुणे.

८) प्रा. डॉ. सतिष ठोंबरे (१५ ऑगस्ट २००७) जिल्हा पशासन आणि स्थानिक स्वशासन, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगपुरा औरंगाबाद.

९) बी. सी. बनुला (२०११) पंजायतीराज व्यवस्था, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली.

१०) डॉ.के. जी. पठाण. डॉ. व्ही. एस. मग्नाके, संदर्भ महाराष्ट्र, इंटेलेक्यु अलबूक ब्यूरो. भोपाळ.

११) शालीनी वाधवा (२०१०) भारतीय स्थानीय प्रशासन, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली.

१२) प्रा. सुभाष शिंदे (२००३) कर्मचारी प्रशासन, कल्पना प्रकाशन, नांदेड.

१३) डॉ. रमेश एखेळीकर (१९९९) भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.

१४) डॉ. आर. पी. जोशी, डॉ. अरुणा भारद्वाज (२००२) भारत मे स्थानिय प्रशासन, शीलसन्स जवाहर नगर, जयपुर.

१५) Maciver R. M. and page C.H (1949), society, The Macmillan and Co. Ltd., London.

१६) Murdock G. P. (1949), social structure , macmillian.
१७) Dr. Karve Iravati, kinship organization in India.
१८) R. K. Bharadwaj, Municipal Administrative in India.
१९) Ms. Neena (2008), Local Government Administration, ALFA PUBLICATRONS, New Delhi.
२०) S.P. Sharma (2006) Rural Development and panchayat Raj, vista International publishing House, Delhi.
२१) U.B. Singh (1997) Urban Local government, Rawat publications, Jaipur.
२२) Subhajit Banerjee, Ramendu Ror (2008) Fundamentals of Research Methodology, Kitab Mahal Agencies, Patana.

ब) नियतकालिके :-

१. समाजप्रबोधन पत्रिका
२. योजना
३. लोकराज्य
४. प्रतियोगिता दर्पन

क) वर्तमानपत्रे

१. दैनिक लोकसत्ता
२. दैनिक महाराष्ट्र टाईम्स
३. दैनिक लोकमत
४. दैनिक सकाळ
५. दैनिक देशोन्नती

ड) Websites :-

१. www.maha.gov.in
२. www.wikipedia.org.in
३. www.hingoli.gov.in.

संशोधक

श्री. सातव सुभाष नारायणराव
समाजशास्त्र विभाग
नागनाथ महाविद्यालय, औंढा नागनाथ

संशोधक मार्गदर्शक

प्रा. डॉ. भिसे रामचंद्र मुंजाजी
(एम.ए. एम. फील.पीएच. डी., नेट)
समाजशास्त्र विभागप्रमुख
दिगंबरराव बिंदू महाविद्यालय
भोकर जि. नांदेड.